# महाराष्ट्र शासन

## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर
इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ई-मेल : maharashtra.cetcell@gmail.com

तंशिप्र- १२२२ /प्र.क्र ०७/केप्रप्र/२०२२/७५०८ दिनांक -१५/०९/२०२२

प्रति,
संचालक/प्राचार्य
ME/M.Tech हा पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रम राबविणारी अभियांत्रिकी महाविद्यालये,
महाराष्ट्र राज्य

**विषय- ME/M.Tech अभ्यासक्रमासाठी पात्र पदवी अभ्यासक्रम आणि Gate पेपरची यादी उपलब्ध करुन देणेबाबत.**

राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाच्या वतीने विविध पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी सामाईक प्रवेश परीक्षांचे आयोजन करण्यात आलेले असून सदर प्रवेश परीक्षांचे निकाल घोषित करण्यात आलेले आहेत. या कार्यालयामार्फत उपरोक्त अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेमार्फत राबविण्यात येणार आहेत.

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये ME/M.Tech या पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे प्रवेश अचूकतेने पार पाडण्यासाठी आपल्या संस्थेने/महाविद्यालयाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ व २०२२-२३ मध्ये नवीन अभ्यासक्रम सुरु करण्याबाबत मान्यता देण्यात आलेली असेल व काही जुन्या अभ्यासक्रमांची प्रवेशविषयक पात्रता निकष (Eligibility matrix) मध्ये सुधारणा केली असल्यास अशा सर्व अभियांत्रिकी महाविद्यालयांना कळविण्यात येते की, उपरोक्त अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया सुरळीतपणे व अचूकतेने पार पाडण्यासाठी या कार्यालयास खालील तक्त्यात नमुद विद्यापीठाच्या शैक्षणिक समितीने मान्यता दिलेली माहिती भरुन या कार्यालयास ई-मेल द्वारे / व्यक्तीश: संस्था प्रतिनिधींनी भेट देऊन दिनांक २१/०९/२०२२ पर्यंत निश्चितपणे उपलब्ध करुन द्यावी. सदर माहिती उपलब्ध न झाल्यास व प्रवेश प्रक्रियेत अडचणी व न्यायालयीन प्रकरणे उद्भवल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित संस्थेची राहिल याची नोंद घ्यावी.

| अ.क्र | एमई/एम.टेक पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमाचे नाव | पात्र पदवी अभ्यासक्रमांची यादी | पात्र Gate परीक्षेचा पेपर/ग्रुप |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| | | | |

(रवींद्र जगताप) भाप्रसे
आयुक्त तथा सक्षम प्राधिकारी
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष